

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : ११ वे अंक : १ ला
एप्रिल, मे, जून २०२०

## समकालीन कथा व व्यावहारिक मराठी विशेषांक

Scanned by CamScanner

१३. नातेसंबंधातील ताण-तणाव प्रदर्शित करणारी कथा 'वापसी' /
डॉ. प्रतिभा शंकर घाग-सोनी ........................ ११३

१४. प्रसंगनिष्ठ विनोदातून लोकप्रबोधन करणारी कथा
'शुभमंगल सावधान' /
डॉ. नानासाहेब पवार ...................... .......... ११८

१५. श्रमप्रतिष्ठा व ध्येयवाद जागवणारी कथा 'कष्टाची भाकरी' /
डॉ. हरेश संपत शेळके .................................. १२८

१६. भाषिक कौशल्ये विकास /
डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे .............................. १३२

१७. आकलनासह श्रवण कौशल्य /
डॉ. तुषार चांदवडकर .................................. १४०

१८. संभाषण कौशल्याचे स्वरूप, महत्त्व
व सुधारणेसंदर्भातील उपाय /
डॉ. राहुल अशोक पाटील .............................. १४४

१९. वाचन कौशल्य /
डॉ. संदीप रंगनाथ तापकीर .............................. १५३

२०. लेखन कौशल्य
डॉ. कीर्ती मिलिंद मुळीक.................................. १६१

२१. ई- संवादाचे स्वरूप व विविध माध्यमे /
डॉ. प्रकाश कारभारी शेवाळे .............................. १६४

२२. सारांश लेखन /
डॉ. नितीन कल्याण मोटे .............................. १७५

२३. सिन्नर महाविद्यालयात पदवी शिक्षण घेणाऱ्या
विद्यार्थ्यांचा वाचन अभिरूचीचा अभ्यास /
डॉ. सुभाष बंडू अहिरे .................................. १८३

Scanned by CamScanner

# १४. प्रसंगनिष्ठ विनोदातून लोकप्रबोधन करणारी कथा 'शुभमंगल सावधान'

– डॉ. नानासाहेब पवार –
मराठी विभाग, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे २८
ई-मेल: nknanakawade@gmail.com भ्रमणध्वनी: ७८७५०६९८७७

**प्रास्ताविक :**

प्राचीन काळापासून भारत देशात विवाहाला धार्मिक बंधनासोबतच एक संस्कार व कर्तव्य समजले जाते. 'विवाह' हा व्यक्तिगत दृष्टिकोनातून पती-पत्नींमधील भागीदारीचा भाग असला तरी विवाहामुळे दोन व्यक्तींबरोबरच दोन कुटुंबे आणि त्यांचे नातेवाईक परस्परांशी जोडले जातात. जीवनभराचे सुख, विकास आणि पुनर्उत्पादनासाठी दोघांनाही या परंपरेने एकत्रित आणलेले असते. सह्योग, प्रेम आणि नि:स्वार्थत्यागांसह काही गुणांची शिकवण येथे मिळते. खरेतर विवाहसंस्थेत विवाहाचे धर्म, जात, परंपरा यानुसार अनेक प्रकार आहेत. असे असले तरी या सर्वांमधून संस्कृती, उपसंस्कृती आणि तिच्या विविध पद्धतींना एकत्र बांधून ठेवणारे ते एक 'पवित्रबंधन' आहे. हे खरे असले तरी अलिकडच्या काळात प्रचलित विवाह समारंभ धूमधडाक्यात- थाटामाटात आयोजन करण्याची रीत आली आहे. समारंभावरील अनाठायी खर्च ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. अनेक स्तरांतून अशा अनावश्यक खर्चिक समारंभावर टीकाही होताना दिसते.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यात कथा, कादंबरी, नाटक, कविता व इतर साहित्यप्रकारात जे लेखन झाले त्याचे मूळही समाज हेच आहे. मराठी साहित्यात व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार, पु.ल. देशपांडे, व.पु. काळे अशा अनेक साहित्यिकांनी महाराष्ट्रभर भ्रमंती करून या मातीत कथाकथनाचे मळे फुलविले. या प्रत्येकाची धाटणी वेगळी असली तरी त्यांची परंपरा, वसा आणि वारसा घेऊन डॉ. संजय कळमकर कथालेखन करताना दिसतात. त्यांच्या 'बे एक बे' या संग्रहातील 'शुभमंगल सावधान' या विनोदी कथेची येथे आस्वादात्मक स्वरूपात मांडणी केली आहे.

**लेखक परिचय :**

डॉ. संजय विठ्ठल कळमकर हे विनोदी लेखक, प्रभावी वक्ते आणि कथाकथनकार म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहेत. ते संघटनात्मक शिक्षक चळवळीचे नेते आहेत. त्यांनी कादंबरी, एकांकिका आणि नाटक या साहित्यप्रकारांतून लेखन केले आहे.



'चिअर्स', 'चिंब', 'टोपीवाले कावळे', 'बे एक बे' हे कथासंग्रह, 'भग्न', 'कल्लोळ', 'उध्वस्त गाभारे', 'सारांश शून्य', 'धुंद', 'एका स्वर्गस्थ देशाची गोष्ट' या कादंबऱ्या, 'नकळत', 'गिधाड' हे दोन एकांकिका संग्रह आणि 'आम्ही सारे चालू' व 'गांधी ते गोधरा' ही त्यांनी लिहिलेली नाटके प्रकाशित आहेत. दैनिक 'सकाळ', 'लोकमत', 'पुण्यनगरी' यांसारख्या अनेक वर्तमानपत्रांतून त्यांनी सदर लेखन केलेले आहे. त्यांचे सकाळमधील 'हलकंफुलकं' हे सदर खूप गाजले होते. त्यांचे संजय कळमकर/ sanjay kalamkar youtube channel अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे.

कळमकर यांना पद्मश्री विखे पाटील, ग. ल. ठोकळ, चतुरस्त्र, वि. स. खांडेकर साहित्य पुरस्कार, इ. राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. याबरोबरच शब्दगंध साहित्य संमेलन, कुसुमाग्रज साहित्य संमेलन, कृष्णा साहित्य संमेलन, राम नगरकर साहित्य संमेलन, आई साहित्य संमेलन मालेगाव या काही साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले आहे.

**कथेतील लग्नपत्रिकेचे स्वरूप :**

अलिकडील लग्नपत्रिका छपाईचे स्वरूप पाहता ते एक विनोदी प्रकरणच आहे. लेखकाने विवाहसंस्थेत बदलत चाललेली ही एक परंपरा वाचकांसमोर मांडली आहे. लग्नपत्रिका पाकीट बाहेर काढत असता शब्दांच्या पलटणीच्या पलटणी अंगावर धावून येत आहेत की काय, असे वाटते. शिवाय त्यावरील शब्दांची छपाई पाहता त्या पत्रिकेबरोबर दुर्बिणही असावी असा मार्मिक टोला लगावला आहे. कारण त्या दुर्बिणीच्या आधारे त्या शब्दमंडळातून लग्नाचे ठिकाण, वेळ, तारीख शोधता आली असती असे लेखकाने खोचक पद्धतीने सांगितले आहे. इतरांवर टीका करणारे आपण आपणावर वेळ येताच स्वत:ही अशाच प्रकारे लग्नपत्रिका छापतो व लोकांत हसे करून घेतो. आपण कसे यंत्रणेचे बळी ठरतो, याकडे समयसूचकपणे वाचकांचे लक्ष वेधले आहे. आजकाल कोणतीही लग्नपत्रिका उघडल्याबरोबर वरच्या बाजूला कुलदैवतांचे नाव असल्याचे दिसते. आपल्याकडे अनेक पर्याय असल्याने ते प्रत्येकाने वेगळे टाकले तरी चालते. त्याखाली नवरदेवाचे नाव व कंसात त्याने मिळवलेल्या (शैक्षणिक पदव्या) डिग्र्या अशी लांबलचक पट्टी पाहून या डिग्र्या मिळतात तोपर्यंत याचे लग्नाचे वय कसे होऊन गेले नाही? हा प्रश्न उपस्थित केला आहे. त्याखाली यांचे सुपुत्र, यांचे नातू, वगैरे मुलांच्या वडिलांचे, आजोबांचे नाव जे कोणी वाचत नाही तेसुद्धा छापलेले असते. हे लेखकाने सूचकपणे अधोरेखित केले आहे. वराचे शिक्षण टाकल्याने वधूचे शिक्षण लिहिले जाते पण काही वेळा मुलगी अकरावी शिकलेली असेल व मुलाचे शिक्षण जास्त आणि मुलीचे शिक्षण अकरावी लिहिण्यास वाईट {Xgb ahUZ FYJC असा समानार्थी शब्द टाकून लायकीचा ताळमेळ साधला जातो



Scanned by CamScanner

याकडे पुढील काळात होऊ घातलेल्या तरुणांच्या विवाहांकडे दृष्टिक्षेप टाकला आहे. मधल्या मायन्यात पाळला जाणारा मुहूर्त असतो. परंतु काही केल्या मुहूर्तावर लग्न लावायचेच नाही तर यासाठी आटापिटा का केला जातो. मूहूर्त नक्की का व कोणासाठी काढत असतात, असा प्रश्न उपस्थित केला आहे.

मतदार संघातील यादीप्रमाणे नावे तर 'आमच्या मामाच्या लग्नाला यायचं हं!' अशी तळटीप टाकलेली असते. ही तळटीप देऊन घरातील सर्व लहान मुलांची नावे दिली जातात. कधीकधी या नावातील मंडळी पाहता विरोधाभास जाणवतो. उदा. चिंटू अतिशय लहान वयाचा वाटावा, पण तो नेमका मोठा असतो. त्याच्या मंडपातील वर्तवणूकीतून विरोधाभास साधून लेखकाने प्रासंगिक विनोदनिर्मिती केली आहे. या पत्रिकेचा एकही कोपरा शिल्लक ठेवलेला नसतो. जागा मिळेल तिथे चार-पाच निमंत्रक, पाच- सहा व्यवस्थापक, दहा- बारा स्वागतोत्सूक अशी पंधरा-वीस नावे त्यांची परवानगी न घेताच टाकली जातात. याव्यतिरिक्त फर्म, दुकाने, पार्लर, सलून, किराणा मार्केट, साखर कारखान्याचे वा विविध संस्थांचे संचालक इ. एक ना अनेक पदनामे टाकून आपले घराणे कसे वजनदार आहे, हे दाखविले जाते. अशा प्रकारच्या लग्नपत्रिकेचे स्वरूप पाहता त्यातील नावांचा, महागड्या लग्नपत्रिकेचा, वा लग्नात केलेल्या अमाप खर्चाचा पुढे प्रपंच सुखी होण्याशी तीळमात्र संबंध नसतो हे लेखकाने येथे सूचित केले आहे.

**मुहूर्तावर लग्न न लागण्याची कारणे :**

'शुभमंगल सावधान' कथेत लेखकाने दिलेल्या मुहूर्तावर लग्न न लागण्याची विविध कारणे सांगितली आहेत. काही गोष्टी समाजमान्य नसताना कशा घडतात नव्हे घडूनच येतात अशी मांडणी विनोदी पद्धतीने रेखाटली आहे. उदा. नवरोबा महागड्या गाडीसाठी अडून बसतो किंवा वरबाप हुंड्याची पूर्ण रक्कम मिळाली नाही म्हणून भिकारी चेहऱ्याने रूसून बसतो तर कधी नवरी दागिन्यासाठी फतकन मारून बसते. कधी वरमाय मानपानात अपमान झाला म्हणून अंगात आणते तर आजकाल नवरीच्या चेहऱ्याची रंगरंगोटी करून- नवरदेवाच्या कपड्याच्या परिधानावरून त्यांची आब राखली जात नाही. बहुतेक वेळा लग्नात नवरदेवाच्या पुढे नाचणारे धिंगाणा घालणारे नर्तक मुहूर्त पायाखाली तुडवून टाकतात. नवरदेवाला टायची गाठ बांधता न येणे असे घटना- प्रसंग किंवा आमदारांचे अचानक आगमन झाल्याने त्यांच्या सत्काराला नवरा- नवरीचा हार वापरणे, तेव्हा नवीन हार येईपर्यंत लग्न थांबविले जाते. परिणामी, लग्न उशिरा लागते. अशी काही कारणे लेखकाने प्रसंगानुरूप रेखाटली आहेत.



**प्रसंगनिष्ठ विनोद :**

या कथेत अनेक प्रसंगनिष्ठ विनोद निवेदनाच्या ओघात आले आहेत. त्यांची दखल वाचकाला घ्यावी लागते. नवरदेवापुढे घोडं अडखळलं किंवा मोकळी जागा दिसली की, लोक ओरडायचे बजाव आणि त्या वाद्याच्या आवाजावर अंगात आल्याप्रमाणे तरण्या पोरांनी धुमशान नाचायला सुरूवात व्हायची. बहुतेक जण गर्दीत शिरून नाचायचे. कारण अनेकांना नाचताच येत नव्हते. तरीसुद्धा नाचणाऱ्यांचे विलक्षण व वैविध्यपूर्ण प्रकार कसे दिसतात, याकडे लेखकाने लक्ष वेधले आहे. 'नवरदेवाची वरात' या प्रसंगाचे निवेदन करताना कौशल्याने विनोदनिर्मिती केली आहे. एकजण नुसताच सलाईन लावून आलेल्या माणसासारखा संथ नाचत होता. त्याच्याशेजारी दुसरा अंगात लाल मुंग्या चावल्यासारखा थयथयात करत होता. एक प्रौढ मनुष्य कांगारूंनी पोटाशी पिल्लू धरावे तसे स्वतःचे गोंडस पोट सांभाळत पाय हलवत होता. तिसरा हातात नसलेला पतंग आभाळाकडे पाहून उडवत होता. चौथा तहानेने व्याकूळ झाल्यासारखा जमिनीत खड्डा खोदावा तसे काहीसे (खाली पाहून) हातवारे करत होता.

अशा प्रकारे, लेखकाने नवरदेवापुढे डी.जे.च्या तालावर नृत्य करण्याचे सूक्ष्म निरीक्षण करून प्रसंगनिष्ठ विनोदनिर्मिती केली आहे. लग्नात या डी.जे.समोर उभे राहून आपल्या हृदयाचे चेकअप करून घ्यावे असा उपरोधही व्यक्त केला आहे.

**उशिरा लागलेल्या लग्नामुळे होणारे परिणाम :**

उन्हाळ्याच्या दिवसात ग्रामीण भागात लगीनसराई असते. बहुधा ही लग्ने दुपारी असतात. उन्हाळ्याच्या दिवसात उन्हामुळे मंडपातील वऱ्हाड वैतागलेले असते. त्यासंदर्भात काही घटना- प्रसंग कथेत आले आहेत. ते वाचकांचे मन हेलावून टाकणारे आहेत. उदा. आई भूक, आई भूक म्हणून पोरं आईजवळ गोंडा घोळत होती. गप्पांमध्ये गुंग आई 'पळ तुह्या बापाकडे जा' म्हणून त्याला टोलवत होती. पोरगं बापाकडे आलं की बाप त्याला फुटबॉलसारखा पुन्हा आईच्या दिशेने उडवत होता. तासाभरापासून फक्त डी.जे.चा आवाज येत होता. प्रत्यक्ष नवरदेव दिसत नव्हता. पोटात कावळ्यांची शाळा भरलेली असताना कोपऱ्यातून कुठूनतरी जिलेबी तळल्याचा खमंग वास सुटला होता. भुकेल्या नजरा वेळोवेळी त्या दिशेला जात होत्या. अशा प्रसंगामधून मानवी स्वभातील इच्छित प्रसंगांना लेखकाने वाट करून दिली आहे. पुढे नवरा- नवरी दोघांना शेजारीशेजारी उभे पाहून वऱ्हाडींची निरीक्षणशक्ती जागी होते, तेव्हा भुकेने पोटात कालवा केल्याने वैतागलेल्या प्रतिक्रिया कशा असतात याचे रेखाटन लेखक करतो. उदा. ती किती गोरी आहे, तो त्यामानाने फार काळा दिसतोय, तो उंच आणि ती बुटकी काही खरं नाही, तो जाड आणि ही



Scanned by CamScanner

काटकुळी भोपळयाशेजारी गवारीची शेंग जशी, ती स्मार्ट दिसतेय हे त्यामानाने नुकतंच झोपेतून उठून आल्यासारखं वाटतंय या प्रतिक्रिया म्हणजे वऱ्हाडी मंडळी कुणीही न विचारता परस्पर कशी समीक्षा करतात, याची मांडणी करतात. लग्नाला उशीर झाल्यामुळे घडणारे असे अनेक रंजक प्रसंग या कथेतून आले आहेत.

**प्रतिष्ठितांचे आशीर्वाद :**

'शुभमंगल सावधान'मधून लेखकाने सद्यस्थितीतील विवाह पद्धतींवर प्रकाश टाकला आहे. लेखकाने त्याच्या जीवनात अनेक विवाहसोहळे पाहिले. लग्न लावत असताना सुरूवातीस काही मंगलाष्टके म्हणून मध्येच विवाह सोहळा थांबवून प्रतिष्ठितांचे नवरा- नवरींसाठी आशीर्वाद घेतले जातात. त्यात प्रतिष्ठितांनी नवरा- नवरींना दिलेले आशीर्वाद आणि नवरा नवरीने यासंदर्भात दिलेली उत्तरे कशी असतात याचे विवेचन करून विनोदनिर्मिती केली आहे. प्रतिष्ठितांपैकी एखादा म्हणतो, या वधू- वरांच्या हातून आई- वडिलांची, सासू- सासऱ्यांची, समाजाची, देशाची सेवा घडो. नवरदेव मनात म्हणतो, प्रपंच कधी करायचा? सारं आमच्या हातून घडो. तुम्ही फिरा बोंबलत. आशीर्वाद देत.. दुसरा म्हणतो, तुमच्या संपत्तीत अमर्याद वाढ होवो. संतती मात्र मर्यादित होवो. कदाचित आशीर्वाद देणाऱ्याला सात- आठ मुले असल्याने नवरी मनात म्हणते, यांच्या लग्नात असा आशीर्वाद द्यायला कोणी नव्हतं वाटतं एखाद्या प्रतिष्ठित घरी बायकोशी भांडून आलेला असतो त्याच्याच प्रपंचाला कुणाच्यातरी आशीर्वादाची गरज असते. मंडपात मात्र तो ऐटीत वधूवरांना आशीर्वाद देतो. एखादे ह.भ.प. महाराजही लग्न झालेले नसताना वधु–वरांना आशीर्वाद देतात. अशा अनेक प्रसंगातून लेखक प्रतिष्ठितांचे आशीर्वाद आणि प्रत्यक्ष स्थिती याकडे वाचकांचे लक्ष वेधतो.

**उपस्थित राजकीय पुढाऱ्यांचे सहेतूक आशीर्वाद :**

हे प्रसंगसुद्धा कथेला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जातात. बहुधा निवडणूक जवळ आलेली असेल तर राजकीय पुढाऱ्यांची निश्चित उपस्थिती लग्न समारंभांना असते. प्रत्येक राजकीय पुढाऱ्याला वाटते की, मला आशीर्वाद द्यायला बोलवताना माझ्या पदाचे नाव, पक्षाचे नाव संयोजकांनी सांगावे, पण संयोजक असा परिचय देत नाही. त्यामुळे हे पुढारी जेव्हा वधू- वरांना आशीर्वाद देताना स्वतःच आपल्या पक्षाचा, चिन्हाचा वापर करून कसे बोलतात, हे प्रसंग लेखक गमतीशीरपणे रंगवून सांगतात. काही निवडक घटना प्रसंगाच्या आधारे लेखक विनोदी पद्धतीने कथनात्मक निवेदन करतो. पहिला म्हणतो प्रपंच म्हणजे घड्याळ. नवरा म्हणजे तास काटा. नवरी म्हणजे मिनिट काटा. खालून कोणीतरी मिश्कीलपणे विचारतो, सासू? सेकंदकाटा. कायम टिकटिक टिकटिक किटकिट करणारा. हे तीन काटे नीट चालले तरच



प्रपंचरूपी घड्याळ नीट चालते. दुसरा हाताच्या पंजा दाखवत म्हणतो, वधूसाठी सांगतो तू ज्या घरात जाणार आहेस तिथे हाताच्या बोटांप्रमाणे वेगवेगळ्या गुणधर्माची माणसे भेटतील. परंतु तू पंज्याप्रमाणे सर्वांना एकत्र ठेवायचे. म्हणजे संसार सुखाचा होईल. तिसरा म्हणतो, लग्न म्हणजे धनुष्यातून सुटलेला बाण. चौथा म्हणतो, यांचा संसार कमळासारखा फुलो. यांना कमळाच्या पाकळ्यांइतकीच मुले होवो आणि ती सारी आमच्या पक्षात येवो. पाचवा म्हणतो, आशीर्वाद देताना मी एक गोष्ट स्पष्ट सांगतो की, मी किंवा माझा एकही कार्यकर्ता या लग्नात जेवणार नाही कारण मला असं समजले की या लग्नाचा स्वयंपाकी बिहारी आहे. हे आशीर्वाद ऐकून शेवटचा म्हणतो, वधूवरांना मी स्पष्ट सांगतो, कुणाचे काही ऐकू नका. स्वतःच्या पायावर उभे राहा. समजून घ्यायचे हा अपक्ष आहे. प्रचंड टाळ्या वाजत असतात. आशीर्वाद संपले असे वाटतानाच अचानक आमदार तिथे येतात. वधूवरांना आशीर्वाद देतात व पुढच्या लग्नाला जातोय म्हणून निघून जातात.

या सर्व उदाहरणांमधून लेखकाने विविध राजकीय पक्षांचा व्यक्तीसापेक्ष विचार मांडला आहे. विनोदाबरोबरच उपहासात्मक मांडणी करण्यात त्यांना यश आले आहे. त्याचप्रमाणे मनुष्य स्वभावाचे विविध पैलू त्यांनी निवेदनाच्या माध्यमातून सांगितले आहेत.

**लग्नमंडपात माणसे ओळखण्याच्या पद्धती :**

लेखक संजय कळमकर यांनी समकालीन लग्न पद्धतींतील गंमतीजमतींचे काही अनुभव सहजतेने येथे आविष्कृत केले आहेत. समाजजीवनात लेखकाला आलेल्या अनुभवांतुन सहज विनोद निर्माण केले आहेत. लग्नमंडपात माणसे ओळखण्याच्या सोप्या पद्धती त्यांनी विनोदी धाटणीने मांडलेल्या आहेत.

नवरदेवाच्या बापाचा चेहरा असा खूप वर्षांनी अनुदान मिळालेला शिक्षकासारखा दिसतो. जो भेटेल त्याला सांगतो, जाताना लक्षपूर्वक भांडी भरा. वाटीसुद्धा ठेवू नका. यावरून वऱ्हाड गेल्यानंतर मंडप का उतरवतात, याकडे लेखकाने लक्ष वेधले आहे. नाहीतर काय हावरट बाप मंडपाचे बांबुही उचलून नेतील अशी कोपरखळी मारली आहे. नवी साडी घालून मंडपात धावपळ करत असते ती नवरदेवाची आई असते. तिचा चेहरा 'असिस्टंट शिक्षिका' मिळालेल्या मुख्याध्यापिकेसारखा दिसतो. जिचा चेहरा रडलेला दिसतो, ती नवरीची आई असते. मंडपभर फिरून काही तरुण करवल्या स्वतःचे मार्केटिंग करतात की, हिचे झाले आता लग्नाला मी आहे. बांबूला टेकुन शून्यात पाहात स्तब्ध उभा असतो तो करवला. याचे झाले आता माझे कधी? असा प्रश्न त्याच्या मनात उपस्थित असतो. लेखकाने येथे नवरा- नवरीचे आई- वडिल व इतरांच्या वागण्या- बोलण्यातील उपहासात्मक भावना रेखाटली आहे.



Scanned by CamScanner

यातून अंतर्मुख करणारा विनोद निर्माण करण्यास लेखकाला यश आले आहे.

**मंडपात जेवणाच्या पंगतीतील अनुभव :**

लग्न लागण्यासाठी शेवटची मंगलाष्टिका होते. वाजंत्री बँड जोरात वाजवू लागले आणि अशा गोंधळात पुरुषांनी मंडपात जेवणासाठी रांगा केल्या. त्या रांगा पाहून आपणाकडे लोकांना शिस्त नाही असे कोणी म्हणू शकणार नाही, असे लेखकास वाटते. कारण त्या शिस्तीने महिला आपोआप मंडपाच्या बाहेर फेकल्या जातात. दोन रांगा करून वाढप्याला वाढायला मध्ये ये- जा करण्यासाठी जागा राहील, याची काळजी घेतली. घाईने पत्रावळ्या मिळाल्या, पण जेवणासाठी लवकर काहीच येईना म्हणून हातात उरलेल्या अक्षदा तोंडात काहींनी टाकल्या. एक पदार्थ ताटात आला की, जेवायला सुरूवात करायची हे निश्चित करणाऱ्या मंडळींच्या ताटात सुरूवातीला भाजी आली, नंतर पुढे पुरीऐवजी मीठ त्यामुळे जेवायला सुरूवात करायची सोयच नव्हती. जेवणात खेड्यांमध्ये एखादा गोड पदार्थ केला जातो. तो प्रमाणातच केला जातो. उदा. लाडू. ते वाढण्यासाठी स्पेशल माणसे असतात. हे खास वाढपे लाडूची घमेले घेऊन पंगतीच्या अलिकडे उभे राहतात, नंतर लाडू- लाडू म्हणत वेगाने निघतात. ते मध्ये कुठेच थांबत नाहीत. जेवणार्याला हात करून अहो, इथे वाढा म्हणेपर्यंत लाडूवाला पुढे पसार झालेला असतो. खरंच लाडू आहेत की, मोकळं घमेलं घेऊन फिरतोय, अशी पण एक शंका येते. आता पुन्हा आल्यावर पकडायचे अशा इराद्याने सारे सावध असतात, परंतु साऱ्यांचा भ्रमनिरास होतो. कारण तो खास वाढप्या तोपर्यंत इतर पंक्तीला आशा लावून पुढे पसार झालेला असतो. एकंदर कोणी म्हणायला नको लाडू आले नाहीत. दुसरीकडे ते संपायलाही नकोत, अशी या वाढप्यावर खास जबाबदारी असते. अशा प्रकारे मंडपात जेवणाच्या पंक्तीत गंमतीजंमती होतात. असे अनेक किस्से लेखकाने रेखाटले आहेत. ग्रामीण भागातील लग्न परंपरेतील अनुभव वाचताना वाचकांना आपलेच वाटतात, असा भास निर्माण करण्यास लेखकाला यानिमित्ताने यश आले आहे.

**नवरीची पाठवणी :**

लग्नाचे दिवसभराचे धार्मिक विधी पूर्ण होतात तेव्हा संध्याकाळ होत आलेली असते. नवरीची पाठवणी या दिवशीचा शेवटचा महत्त्वाचा कार्यक्रम सुरू होतो. त्यालाच 'नवरी वाटे लावण्याचा कार्यक्रम' म्हटले जाते. ग्रामीण भागात दिवसभराचा वैताग या कार्यक्रमात काढला जातो. एखाद्या पाहुणीला मानाची साडी मिळालेली नसते, ती या कार्यक्रमात शिरून रडते. एखाद्या पाहुण्याचा अपमान झालेला असतो. तो सेपरेट रडता येत नाही म्हणून गर्दीत सामील होऊन रडून घेतो. हे दृश्य पाहून आपणासाठी किती लोक रडत आहेत हे पाहून नवरीचा ऊर भरून येतो. या सर्व



अनुभूतींना लेखक मात्र रडण्याच्या वेगवेगळ्या पद्धती मानतो. 'व्यक्ती तितक्या प्रकृती'नुसार हे सर्व घडत असते. नवरी सासरी निघताना 'नवरदेव पुढे नवरी मागे' अशी वरात गाडीकडे निघते. नवरदेवाच्या हातात संरक्षणार्थ कट्यार असते. तिचे रक्षण करता करताच नवरदेवाचा निम्मा जीव गेलेला असतो. गाडी गच्च भरते. त्यांनी चार मुली पाठविल्या होत्या. आपल्या सहा पाठवा म्हणून अतोनात कोंबाकोंबी केली जाते. नवरी बसली त्या बाजूने गर्दी होते आणि नवरदेव अर्धा बाहेर तर दुसऱ्या बाजूने ड्रायव्हर अर्धा बाहेर असतो. गाडी हलते आणि नवरीची आई हुंदका देते. सर्वजण गाडीला टाटा बाय- बाय करतात. दूर गेलेल्या गाडीकडे पाहात उभा राहणारा एक माणूस असतो. तो नवरीचा बाप, काळजाचा तुकडा दूर गेला म्हणून हुंदका फोडतो आणि मनावरचे ओझे हलके झाले म्हणून सुखावतो. आता खूप दिवसांनी मनमोकळा हसायचे म्हणून मागे फिरतो आणि पुन्हा रडायला सुरूवात करतो कारण त्याच्यापुढे हात करून उभे असतात.... घोडेवाला, मंडपवाला, आचारी, सोनार, किराणा दुकानदार आणि दुरून छदमी हसणारा एखादा सावकारसुद्धा! असा प्रश्न लेखकाने कथेच्या शेवटी उपस्थित करून मुलीच्या आई-वडिलांना आनंदाबरोबरच दुःख होते. याचे मुख्य कारण अलिकडील या लग्नांचा अमाप वाढलेला खर्च होय. या अमाप खर्चामुळे सर्वसामान्य माणसाची होणारी दुःस्थिती मांडण्यात लेखक यशस्वी झाला आहे. कथेच्या शेवटच्या ओळीने वाचक अंतर्मुख होतो.

**भाषाशैली :**

'शुभमंगल सावधान' ही कथा ग्रामीण व नागर अशा दोन्ही समाजजीवनांचे दर्शन समर्थपणे घडवते. कथा लेखन व कथाकथनाची लेखकाची भाषाशैली आकर्षक व वेगळी आहे, हे जाणवते. लेखनामध्ये ती कथा काही प्रमाणात प्रमाणभाषेकडे झुकते परंतु बोलीला तिने सोबत घेतलेले आहे. खरे तर, कथाकथनावेळी लेखक कळमकर ग्रामीण बोलीचा आपल्या खास शैलीत वापर करून घेतात. विनोद व दाखल्यांची पेरणी करून ते श्रोत्यांसमोर ती कथा अधिक परिणामकारकपणे मांडतात. कथेच्या माध्यमातून जाणूनबुजून नव्हे तर समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो म्हणून ते लोकशिक्षकाची भूमिका स्वीकारतात. आपली कथा विविध स्तरांना कशी स्पर्श करेल याकडे तिचे अधिक लक्ष दिसते. त्यांच्या कथेत सामाजिक, शैक्षणिक, कौटुंबिक समाजवास्तव परखडपणे प्रकटते. हसता- हसता वाचक अंतर्मुख झाल्याशिवाय राहात नाही. हे त्यांच्या कथेचे वेगळेपण आहे. भाषाशैलीच्या योग्य व समयसूचक वापरामुळे त्यांच्या कोट्या अफलातून असतात. ओघवती शैली हे त्यांचे भाषिक वैशिष्ट्य होय. ग्रामीण माणसाच्या जगण्यातील विसंगती- लबाडी, त्यातून निर्माण होणारा विनोद ते उपहास व विडंबनातून मांडतात. गंमतीजमती, विनोद व रंजनाबरोबर



Scanned by CamScanner

त्यामागचे भेदक वास्तवही उलगडत जाते.

थोडक्यात, त्यांच्या लेखनाची व भाषणाची भाषा सहज, सोपी, प्रवाही आणि नैसर्गिक आहे. ते एक चिंतनशील विनोदी लेखक म्हणूनच नव्हे तर व्याख्याते व कथाकथनकार म्हणूनही लोकप्रिय आहेत. यामागे त्यांची भाषाशैली हीच केंद्रवर्ती आहे.

**कथेचे वेगळेपण :**

डॉ. संजय कळमकरांनी या कथेच्या माध्यमातून गंभीर समाजवास्तव आविष्कृत केले आहे. लेखकाचा कथा निर्मितीमागील दृष्टिकोन मनोरंजनातून लोकप्रबोधन आहे. हे त्यांच्या कथेचे वेगळेपण आहे. जीवनदृष्टी हाच त्यांच्या कथेचा मूळ हेतू असतो. त्यांच्या कथांचे निवेदन, घटना प्रसंगांची कालानुक्रमाबरोबरच कार्यकारणभावाने परस्परांशी गुंफण ही वेगळेपणा दाखविते. या कथेत शब्दांच्या आधारे प्रत्यक्षातील माणसाची प्रतिमा लेखक उभी करण्यात यशस्वी झाला आहे. कथेत सौंदर्यनिर्मिती आणि कलात्मकता साधण्यासाठी निवेदन आणि वर्णन यांच्याआधारे कथेतील पात्र जिवंत ठेवण्यात लेखकास यश मिळते ते त्यातील वेगळेपणामुळेच. ही कथा विनोदी स्वरूपाची असली तरी मानवी जीवनावर खोल परिणाम करते. कथेतील निवेदनाच्या आधारे वर्णन, संवाद इ.साठी भाषेची अर्थपूर्ण आणि प्रवाही योजना लेखक जाणीवपूर्वक कथेत करतो. त्यामुळे पात्रे, घटना- प्रसंग, वातावरणनिर्मिती, निवेदन, भाषाशैली, इ. घटकांचा एकात्मभाव अनुभव प्रथमपुरुषी निवेदनातून ते घडवून आणतात. हे त्यांच्या कथेचे वेगळेपण आहे.

**समारोप :**

विवाह हा जीवनातील एक महत्त्वाचा संस्कार आहे. सध्याच्या विवाह सोहळ्यात पारंपरिक रीतीरिवाजाबरोबरच लग्नपद्धती, लग्नपत्रिका, नवरा- नवरीचा अतिरेकी मेकअप, डी.जे.वरील तरूणाईचे थिरकणे, वऱ्हाडी मंडळींची सोशिकता, राजकीय पुढाऱ्यांची सहेतुक हजेरी यांची भर पडलेली आहे. अलिकडील विवाहपरंपरेत मूळ हेतू हे केवळ नावापुरते सोपस्कार ठरले आहेत. या सोपस्काराऐवजी विवाहामध्ये भव्यदिव्यता, उत्साही रूप, श्रीमंतीचा बडेजाव, खोटी प्रतिष्ठा व अमाप खर्च यांना अनावश्यक महत्त्व आले आहे. या कथेमध्ये विवाहातील हे सर्व सोपस्कार त्यातील संगती, विसंगती, गंमतीजमती, प्रत्यक्षपणे प्रकट झाले आहेत. उपरोध, उपहास, शब्दनिष्ठ, प्रसंगनिष्ठ विनोदातून हे कथानक लय पकडते. सर्वांच्याच अनुभवविश्वातील वास्तविकतेला विनोदाच्या साह्याने कथारूप दिल्याने लग्नविधीतील सत्याचे पैशांच्या उधळपट्टीतून निर्माण होणाऱ्या समस्यांचे, प्रथा परंपरांचे कडा आणि कंगोरे उघडलेले जातात.



मानवी स्वभावातील विसंगती, अज्ञान, प्रसिद्धीचा हव्यास, धूर्तपणा, विक्षिप्तपणा, संधिसाधूपणा, यातून साधलेला विनोद कथेची उंची वाढवतो. प्रथमपुरूषी निवेदनातून या विषयाचे समकालीन वेगळेपण मांडताना लेखकाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि नर्मविनोदी भाषाशैली ठळकपणे जाणवत राहते. मनोरंजनाबरोबरच समाजजीवनाचे वास्तव ही कथा उलगडते. वाचकांना ही कथा विनोदी वाटत असली तरी ते शेवटी अंतर्मुख होऊन जातात, हेच या कथेचे व लेखकाचे यश आहे.

**संदर्भ :**

१. लांडगे, शिरीष (डॉ.) व इतर (संपा.) 'समकालीन मराठी कथा': अक्षरबंध प्रकाशन, पुणे; प्रथमावृत्ती: जून २०१९

२. कळमकर, संजय (डॉ.): विकिपीडिया

३. sanjay kalamkar youtube channel

ೞೞ



Scanned by CamScanner